UPA

IMPACT FACTOR 5.473(SJIF)

UPA NATIONAL E-JOURNAL

Interdisciplinary Peer-Reviewed IndexedJournal

ISSN 2455-4375

# कोविड २०१९ चे भारताच्या अर्थव्यवस्थेवर आणि व्यापारावर होणारे परिणाम

**डॉ. रामेश्वर बी. पाठेकर**

वाणिज्य विभाग,

पंढरीनाथ महाविद्यालय

नरखेड

---

*सारांश : २०१९ मध्ये सर्वप्रथम भारताचे शेजारी राष्ट्र चीनमध्ये कोरोनाचा विषाणू आढळला. तोपर्यंत जगातील सर्वसामान्य नागरिकांना कोरोना हा शब्द माहित नसावा. या कोरोनाची पहिली लाट पाश्चिमात्य राष्ट्रांत वेगाने पसरली. अमेरिका, इंग्लंड, रशिया, ब्राझील, जापान, फ्रांस आणि जगातील इतर देशात कोरोनाने गंभीर स्वरूप धारण केले. जगावर महामारीचे संकट कोसळले, जगाला तिसर्या महायुद्धात लोटले. विकसित देशांची अर्थव्यवस्था ढासळली. कोट्यावधी नागरिकांना आपला रोजगार गमवावा लागला एकट्या अमेरिकेत पाच लाखापेक्षा अधिक लोकांनी आपले गमावले. दुसरा क्रमांक ब्राझील या देशाचा लागतो. जगातील सर्व राष्ट्रांचे व्यासपीठ असलेली संयुक्त राष्ट्र (U.N.O.) या संघटनेने सुद्धा कोरोनामुळे होणाऱ्या महामारीवर चिंता व्यक्त केली. शिवाय कोरोनाचे जगातून लवकर उच्चाटन होणाची शक्यता नाही असा इशारा या संघाटनेने जगातील राष्ट्रांना दिला आहे. पाश्चिमात्य राष्ट्रांनी कोरोन विषाणूवर मात करण्यासाठी लसीचे उत्पादन सुरु केले आणि संशोधन कार्य सुरु केले आहे.*

---

**प्रस्तावना:**

भारत आणि कोविड १९ – भारतात जानेवारी २०२० मध्ये केरळ राज्यात सर्वप्रथम कोरोन विषाणूचा पॉझीटिव्ह रुग्ण आढळला. त्यानंतर देशातील सर्व राज्यांत कोरोना वेगाने पसरला. पॉझीटिव्ह रुग्णांच्या संख्येत मोठ्या प्रमाणात वाढ झाली. मार्च/एप्रिल २०२० या दोन महिन्यात कोरोनाने थैमान घातले. केंद्रशासनाने आणि राज्यसरकारांनी कोरोन विरुद्ध युद्ध पातळीवर प्रयत्न सुरु केलेत. देशभर लॉकडाऊन (टाळेबंदी) घोषित केले. लाखो नागरिकांना आपले प्राण गमावले. शासकीय आणि खाजगी रुग्णालयात पॉझीटीव्ह रुग्णांना भारती व्हावे लागले. त्यांच्या खर्चाचा काही भार केंद्रशासनाने स्वीकारला. विकास्कामाकरिता राखून ठेवलेला निधी कोरोनाविरुद्ध लढण्याकरिता खर्च करावा लागला. कोरोना लसीचे देशात उत्पादन सुरु केले. ग्रामीण भागातील अल्पभूधारक शेतकरी आणि शेतमजुरांना केंद्रशासनाने प्रत्येकी पाच किलो गहू, तांदूळ आणि डाळीचे वाटप केले. अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या खात्यात वर्षाकाठी सहा हजार रुपये जमा करण्यात आले. ऑक्टोबर, नोव्हेंबर २०२० मध्ये कोरोनाला काही प्रमाणात नियंत्रित करण्यात शासनाला यश प्राप्त झाले. त्यामुळे लॉकडाऊन उठविण्यात आले. जनजीवन सामान्य होऊ लागले. त्यामुळे नागरिकांनी पुन्हा स्वैराचारी वृत्तीने वागण्यास सुरुवात केली. द्व्शातून कोरोनाचे उच्चाटन होईल अशी शासनाची आणि नागरिकांची धारणा होती. केंद्र आणि राज्यसरकारे सुद्धा गाफील राहिली. वैद्यकीय सुविधा उपलब्ध करण्याकडे शासनाचे दुर्लक्ष झाले.

जानेवारी २०२१ च्या सुरुवातीपासूनच जगात आणि भारतात कोरोनाची दुसरी लाट वेगाने पसरली. कोरोना पॉझीटीव्ह रुग्णांची संख्या लाखोंच्या घरात पोहोचली. रुग्ण भारती करण्याकरिता शासकीय आणि खाजगी रूग्णालयात बेड उपलब्ध नव्हते ओक्सिजनचा (प्राणवायूचा) तुटवडा मोठ्या प्रमाणावर निर्माण झाला. त्यामुळे हजारो रुग्णांना आपले प्राण गमवावे लागले. तहान लागल्यावर विहीर खोदन्याचाच हा प्रकार होता. कोरोनाचे भीषण वास्तव्य लक्षात घेऊन केंद्र आणि राज्यशासनांनी लसीकरणाचा निर्णय घेतला. तरुणांच्या मृत्युसंख्येत वाढ झाल्यामुळे उच्च न्यायालयाने केंद्रशासनाला फटकारले त्यामुळे १८ ते ४४ या वयोगटातील नागरिकांचे लसीकरण करण्याचा निर्णय घेतला. त्यमुळे देशात लसीचा मोठ्या प्रमाणावर तुटवडा निर्माण झाला. वास्तविक कोरोनाची पहिली लाट ओसरल्यानंतर देशात लसीचे उत्पादन वाढवून त्याचा साठ करणे आवश्यक होते पण केंद्रसरकारने जगातील ९१ राष्ट्रांना कोवीशिल्ड, कोव्हाक्सीन लसीचा पुरवठा केला. त्यामुळे १३५ कोटी लोकसंख्या असलेल्या आपल्या देशात जवळपास ९४ कोटी नागरिकांना लसीची आवश्यकता भासणार आहे. आणि सद्यातरी लसींचा तुटवडा मोठ्या प्रमाणावर निर्माण झाला आहे. जुलै २०२१ मध्ये काही प्रमाणात दिलासा मिळू शकते.

भारताची अर्थव्यवस्था आणि व्यापारावरील कोविड १९ चे परिणाम:- भारत जगातील लोकसंख्येच्या बाबतीत दुसऱ्या क्रमांकाचा देश आहे. स्वातंत्र्याच्या ७४ वर्षानंतरही आपला देश अजूनही विकसनशील देशाच्या यादीतच समाविष्ट आहे. आपल्या गणराज्याला ७१ वर्षे पूर्ण होऊनही प्रत्येक नागरिकाला अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण आणि आरोग्य या मुलभूत गोष्टी पुरविण्यात शासनाला यश प्राप्त झाले नाही. आपल्या संविधानाने लोककल्याणकारी राज्याची संकल्पना स्वीकारली आहे. त्यामुळे नागरिकांना मुलभूत गरजा पुरविण्याचे घटनात्मक जबाबदारी केंद्र आणि राज्य या दोन्ही सरकारांचे आहे. जगातील बहुताश देश नागरिकांचे शिक्षण आणि आरोग्य यावर राष्ट्रीय उत्पन्नाच्या ६ टक्के खर्च करते. मात्र आपल्या देशात हा खर्च अजूनही ३ टक्क्यांच्या वर नाही.

कोरोनामुळे देशाच्या उत्पन्नात घट झाली आहे. रोजगार बुडाल्यामुळे कर्मचारी बेरोजगार झाले. त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे. यातूनच पुढे आत्महत्येचा धोका संभवू शकतो. देशातील केंद्र आणि राज्य सरकार कर्ज उभारून विकासकामांना गती आणि कोरोना विरुद्ध लढा देत आहे. मात्र कर्ज उभारण्याला सुद्धा मर्यादा आहे. कोरोनाचा लढा दीर्घकाळ चालणार आहे. अशा वेळी शासन आणि जनता यांनी परस्परांना सहकार्य करून, विश्वासात घेऊन वाटचाल करावी लागणार आहे. देशाची अर्थव्यवस्था डबघाईस आली आहे. यातून भरारी घेण्याकरिता आत्मनिर्भर होण्याची गरज आहे. शासनाने डीझेल, पेट्रोल, GAS यांच्या किमतीत भरमसाठ वाढ केली आहे. वाहतूक खर्च वाढल्यामुळे जीवनावश्यक वस्तूंच्या किमती गगनाला भिडल्या आहेत. सर्वसामान्य जनतेला उत्पन्न आणि खर्च यांचा मेळ बसविणे अशक्य झाले आहे.

कोविड आणि व्यापार :- आंतरराष्ट्रीय राजकारणात स्वतःचा प्रभाव निर्माण करण्याकरिता कोणत्याही देशाचे परराष्ट्र धोरण महत्वाचे ठरते शेजारी आणि जगातील इतर राष्ट्रांशी मैत्रीचे संबंध प्रस्थापीत करावे लागतात. व्यापारात वस्तूची देवाणघेवाण (आयात-निर्यात) करावी लागते. कोरोना लसींच्या उत्पादनाकरीता कच्च्या मालाची आवश्यकता आहे.

थोडक्यात सांगायचे म्हणजे कोविड १९ ने भारताचे अर्थकारण आणि आंतरराष्ट्रीय व्यापार यात घट झाली आहे. भविष्यात भारताला महाशक्ती बनविण्याचे आपल्या सरकारचे धोरण आहे. त्याकरिता प्रथम आपली अर्थव्यवस्था मजबूत करावी लागेल. आणि व्यापारात आयात करण्यापेक्षा निर्यातीवर अधिक भर द्यावा लागेल.

**संदर्भ ग्रंथ सूची :**


- भारतीय अर्थशास्त्र – डॉ. जी. एम. झामरे
- तरुण भारत